हिंदु संघटन आणि हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी कार्यरत

# हिंदु जनजागृति समिति

नोंदणी क्र. : 1540/I-634, १२.११.२००२, फोंडा, गोवा.

भ्रमणध्वनी
९३२६१०३२७८
ई-मेल
contact@HinduJagruti.org
संकेतस्थळ
www.HinduJagruti.org

नोंदणीकृत कार्यालय : 'मधु स्मृति', घर क्र. ४५७, पहिला मजला, बैठक सभागृह, सत्यनारायण मंदिराजवळ, ढवळी, फोंडा, गोवा ४०३ ४०१.

।। जयतु जयतु हिंदुराष्ट्रम् ।।

दिनांक : १७ मार्च २०१५

प्रति,

संपादक महोदय/प्रमुख प्रतिनिधी

**कृपया प्रसिद्धीसाठी**

**हिंदु जनजागृती समितीची गोवा शासनाकडे मागणी**

**'वास्को-द-गामा' या शहराचे 'संभाजीनगर' असे नामकरण करा**

पणजी, १७ मार्च - 'वास्को-द-गामा' या शहराचे 'संभाजीनगर' असे नामकरण करण्याची मागणी हिंदु जनजागृती समितीने गोवा शासनाकडे १७ मार्च या दिवशी एका निवेदनाद्वारे केली आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा २० मार्च या दिवशी बलीदानदिन आहे. या बलीदानदिनाचे औचित्य साधून 'वास्को-द-गामा' शहराचे नाव बदलून शहराला 'संभाजीनगर' असे नाव देण्याची मागणी करण्यात आली आहे. हिंदु जनजागृती समितीने २०११ या वर्षी तत्कालीन काँग्रेस शासनाकडे ही मागणी केली होती.

या निवेदनात म्हटले आहे की, गोवा राज्याला स्वातंत्र्य मिळून ५० वर्षांहून अधिक कालावधी उलटला आहे, तरी दुर्भाग्याची बाब म्हणजे गुलामगिरीच्या पाऊलखुणा गोव्यात अजूनही कायम आहेत. समुद्रावरील जहाजांना लुटणारा चाचा 'वास्को-द-गामा' याचे नाव शहराला अजूनही आहे. हे गुलामगिरीचे लक्षण आहे. पोतुर्गिजांच्या जुलूमी राजवटीच्या विरोधात प्राणपणाने लढणाऱ्या क्रांतीकारकांच्या प्रती हा कृतघ्नपणा दाखवल्यासारखेच आहे. पोर्तुगिजांच्या जुलूमी राजवटीच्या विरोधात छत्रपति शिवाजी महाराज आणि त्यांचे पुत्र संभाजी महाराज यांनी लढा दिला आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांनी गोव्यात पोर्तुगिजांना सळो कि पळो करून सोडले होते, अशी इतिहासात नोंद आहे. आज भारतातील शूरवीर योद्धे आणि क्रांतीकारक यांचे बलीदान सोयीस्कररित्या विसरण्याचा कृतघ्नपणाही केला जात आहे. आजच्या शालेय पाठ्यपुस्तकांमध्येही छत्रपति शिवाजी महाराज, संभाजी महाराज, क्रांतीकारक आदींचा उल्लेख क्वचितच आढळतो. खरेतर भारतातील शूरवीर योद्धे आणि क्रांतीकारक यांच्या स्मृतीची भावी पिढीला माहिती करून देणे अन् त्यांची सर्व भारतीयांना सदैव आठवण रहावी यासाठी प्रत्येक देशभक्ताने प्रयत्नरत रहाणे, ही आता काळाची गरज आहे. गोवा विधानसभेचे माननीय सभापती श्री. राजेंद्र आर्लेकर यांनीही नुकतेच 'वास्को-द-गामा' या शहराचे नाव 'संभाजीनगर' असे ठेवण्यासंबंधी विचार करण्यास हरकत नसल्याचे विधान केल्याचेही निवेदनात म्हटले आहे. या निवेदनाच्या प्रती महसूलमंत्री, वीजमंत्री श्री. मिलींद नाईक, मुरगाव तालक्याचे शासकीय अधिकारी आणि मुरगाव नगरपालिकेला देण्यात येणार आहेत.

आपला विश्वासू,

हिंदु जनजागृती समितीकरिता

डॉ. मनोज सोलंकी, राज्य समन्वयक, संपर्क क्र.९३२६१०३२७८